निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८२ वा
मंगळवार -२७ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## हरित क्रांतीचे जनक दिवंगत वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते लोकार्पण



**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड प्रतिनिधी**/ हरित क्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळा व परिसर सुशोभिकरण कामाचे लोकार्पण केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते.

नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक येथे झालेल्या या लोकार्पण सोहळ्यास इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार बाबुसिंग महाराज राठोड, आमदार बाबुराव कदम, आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आदी उपस्थित होते.

प्रारंभी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर श्री. शाह यांनी कळ दाबुन पुतळ्याचे व नामफलकाचे अनावरण केले.

याप्रसंगी बंजारा समाजाच्यावतीने श्री. शाह व श्री. फडणवीस यांचा पारंपारिक पद्धतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाजाचे नागरिक उपस्थित होते.

हरितक्रांतीचे जनक दिवंगत वसंतराव नाईक यांचा पूर्णाकृती पुतळा नांदेड - वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरातील कै. वसंतराव नाईक चौक परिसरात उभारला आहे. नऊ फूट उंचीच्या या पुतळ्याचे वजन सुमारे ७०० किलो आहे. पुतळ्याच्या उभारणीसाठी रुपये १३ लक्ष ९९ हजार एवढा खर्च आला आहे. २३२.६० चौ.मी. जागेत या पुतळ्याची उभारणी करण्यात आलेली आहे. सुशोभिकरणाची अंदाजे ६९ लाख रुपयांची कामे आहेत.

## ग्रंथालय प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करावी - चंद्रकांत पाटील



**मुंबई** / ग्रंथालय प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. पात्र ग्रंथालयांच्या वर्गबदल प्रक्रियेसाठी ऑनलाईन प्रणाली विकसित करावी असे, निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात ग्रंथालय संचालनालयाच्यावतीने सविस्तर सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे यांच्यासह ग्रंथालय विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, ग्रंथालय श्रेणीकरणाचे निकष स्पष्ट करताना 'ड' वर्गातून 'क' वर्गात रूपांतरासाठी किमान १००१ ग्रंथ संख्या , तर 'क' वर्गातून 'ब' वर्गात जाण्यासाठी किमान ५००१ ग्रंथ संख्या आणि ' ब ' वर्गातून 'अ ' वर्गात रुपांतरासाठी १५००१ ग्रंथ संख्या आवश्यक आहे. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या प्रस्तावित इमारतीसह अधिनस्त कार्यालयांच्या प्रलंबित बाबींवरही बैठकीत चर्चा झाली'ग्रंथालयांचे आधुनिकीकरण आणि सुलभता यावर भर द्यावा. ऑनलाइन प्रणाली विकसित केली तर ग्रंथालय सेवांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचेल, असेही उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी सांगितले.

सादरीकरणातच्या माध्यमातून ग्रंथालय व्यवस्थापन प्रणाली, अनुदान प्रणाली, विभागीय व जिल्हास्तरीय ग्रंथालयांचे कार्य, ग्रंथालय समित्या आणि नवीन ग्रंथ धोरण यावर सविस्तर चर्चा झाली.

## हगवणे पिता-पुत्रांना आसरा दिल्याने माजी मंत्र्यांच्या मुलासह ५ जणांना अटक

**पुणे** / शहरातील वैष्णवी हगवणे आत्महत्याप्रकरणात पोलिसानी ५ जणांना अटक केली होती. त्यामध्ये, वैष्णवीच्या पती,सासू आणि नणंदेला सर्वात अगोदर अटक करण्यात आली होती. तर, फरार असलेल्या सासरा राजेंद्र आणि दीर सुशील हगवणे यांस मध्यरात्री बेड्या ठोकल्या होत्या. आता, याप्रकरणी, पोलिसांनी आणखी ५ जणांना अटक केली असून एका माजी मंत्र्यांच्या मुलाला देखील ताब्यात घेण्यात आलं आहे. पोलिसांनी अटक केलेल्या पाचही आरोपींना उद्या न्यायालयात हजर केले जाणार आहे. पोलिसांत गुन्हा दाखल झाल्यानंतर पुण्यातून पळून गेलेल्या राजेंद्र आणि सुशील यांना आसरा देण्याच्या आणि पळून जाण्यासाठी मदत केल्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे.

राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा सुशील हगवणे १७ मे ते २२ मे या कालावधीत अटक टाळण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी लपुन राहीले होते. या कालावधीत त्यांना आसरा देणाऱ्या ५ जणांना बावधन पोलीसांनी अटक केली आहे. त्यामध्ये, राजेंद्र हगवणे यांच्या मित्रासह कर्नाटकमधील एका माजी मंत्र्यांच्या मुलाला देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. प्रितम वीरकुमार पाटील असं आरोपीचं नाव असून तो माजी मंत्री वीरकुमार पाटील यांचा मुलगा आहे.

मोहन भेगडे (मित्र), मोहन बंडू फाटक (पवना डॅम जवळील फार्म हाऊसचा मालक), अमोल जाधव (सातारा जिल्ह्यातील पुसेगाव मधे हगवणे पिता पुत्रांना फार्म हाऊसवर आसरा देणारा), राहूल जाधव (सातारा जिल्ह्यातील पुसेगाव मधे हगवणे पिता पुत्रांना फार्म हाऊसवर आसरा देणारा ) आणि प्रितम वीरकुमार पाटील (काँग्रेसचे कर्नाटकातील माजी मंत्री वीरकुमार पाटील यांचा मुलगा, कर्नाटकातील कोगनोळी या ठिकाणी हगवणे पिता पुत्रांना आसरा दिल्याबद्दल अटक) यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे.

या सर्व आरोपींना उद्या न्यायालयात हजर केले जाणार आहे.

## मार्च २०२६ पूर्वी संपूर्ण देश नक्षलमुक्त करणार! केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची नांदेडच्या शंखनाद सभेतून ग्वाही

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड प्रतिनिधी**/ 'ऑपरेशन सिंदूर' कारवाईतून भारताने आपली क्षमता आणि ताकद जगासमोर सिद्ध केली असून भारताकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांची गय केली जाणार नाही असा स्पष्ट इशारा मोदी सरकारने केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर जगाला दिला आहे. आता देशातील नक्षलवाद्यांचे अड्डेही उद्ध्वस्त करण्यात येत असून ३१ मार्च २०२६ या तारखेपूर्वी या देशाच्या भूमिवरून नक्षलवादाचा नायनाट झालेला असेल, या संकल्पाचा पुनरुच्चार आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी नांदेड येथील प्रचंड शंखनाद सभेत बोलताना केला.

गेल्या २२ एप्रिलला पहलगाममध्ये पाक प्रशिक्षित अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप पर्यटकांची भ्याड हत्या केली, तेव्हाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवाद्यांना धूळ चारण्याचा इशारा दिला होता. १० वर्षांपूर्वीची काँग्रेसची सत्ता संपली आहे, आता मोदी सरकार आहे, याचा पाकिस्तानला विसार पडला. पहलगाम हल्ल्यानंतरच्या ऑपरेशन सिंदूर कारवाईत पाकिस्तानात घुसून शेकडो पाकिस्तानी अतिरेक्यांना ठार करून केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर संपूर्ण जगाला एक संदेश दिला गेला आहे. भारताच्या जनतेवर, सीमेवर हल्ला झाला तर 'गोली का जवाब गोले से दिया जायेगा', हा संदेश देऊन ७ मे रोजी २२ मिनिटांत अतिरेक्यांचे नऊ अड्डे उद्ध्वस्त करण्याचे काम भारतीय सेनेने केले. ८ मे रोजी पाकिस्तानने ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचे हल्ले केले, पण आपल्या सक्षम सुरक्षा व्यवस्थेने एकही क्षेपणास्त्र किंवा ड्रोन भारताच्या भूमीवर घुसू न देता हवेतच त्यांची वासलात लावली. ९ तारखेला पाकिस्तानच्या एअर डिफेन्स सिस्टीम आणि हवाई तळांवर हल्ले करून आमच्या सेनेने त्यांची पूर्णपणे वाताहत केली, आणि आमच्या माताभगिनींच्या कपाळावरचे 'सिंदूर' स्वस्त नाही, याची जाणीव जगाला करून दिली. हा नवा भारत असून विकसित आणि बलवान भारताकडे कोणाचीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमतही होणार नाही, हे मोदी सरकारने सिद्ध करून दाखविले. रक्त आणि पाणी एकत्र वाहणार नाही, व्यापार आणि दहशतवादही एकत्र चालणार नाही, हे मोदी यांनी बजावले आहे. यापुढे अशी आगळीक केलीच तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशाराही मोदी यांनी दिला आहे. पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आणण्यासाठी सर्वपक्षीय नेते जगाच्या वेगवेगळ्या देशांत जात असताना, उद्धव ठाकरेंच्या पक्षाच्या एका नेत्याने गळे काढण्यास सुरुवात केली, पण जर बाळासाहेब असते, तर ऑपरेशन सिंदूर च्या यशस्वी कारवाईबद्दल त्यांनी मोदीजींना मिठी मारली असती, अशा शब्दांत श्री. शाह यांनी ठाकरे यांच्या पक्षाचे प्रवक्ते संजय राऊत यांचा नामोल्लेखही न करता टीका केली. या सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळात त्यांच्या पक्षाचेही प्रतिनिधी आहेत, पण उद्धव सेना त्याची वरात म्हणून संभावना करते, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.




आपल्या भाषणात शाह यांनी फडणवीस सरकारने मराठवाड्यात सुरू केलेल्या पाणी योजनांचा संपूर्ण तपशील मांडला. ठाकरे सरकारने त्यामध्ये अडथळे आणले, पण आता पुन्हा देवेंद्र फडणवीस सरकारने या सर्व प्रकल्पांना गती दिली असून मराठवाड्याच्या प्रत्येक घरात, शेतात पाणी पोहोचेल अशी व्यवस्था केली आहे, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची जुनी मागणी असतानाही शरद पवार यांच्यासारख्या दीर्घकाळ केंद्रीय मंत्री राहिलेल्या नेत्याने काहीच केले नाही, ते काम मोदीजींनी केले, असे ते म्हणाले. येत्या काही वर्षांत शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक आणि सावरकरांची ही महाराष्ट्र भूमी विकसित भारताच्या निर्मितीत अग्रेसर राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश भाजपा कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री व खा. अशोक चव्हाण, आदी नेत्यांचीही या विशाल सभेत भाषणे झाली.

ऑपरेशन सिंदूर कारवाईतून पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली सेनादलाने केलेल्या कारवाईतून भारताने आपली ताकद जगाला दाखवून दिली आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले, तर या सभेच्या माध्यमातून संपूर्ण भारत पंतप्रधान नरेंद्र मोदी व पराक्रमी भारतीय सेनादलांचे अभिनंदन करण्यासाठी सरकारसोबत उभा आहे, अशी ग्वाही प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिली.

## 'स्वस्ती निवास' कौटुंबिक संवेदना जपणारे केंद्र म्हणून ओळखले जाईल; नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटला सर्वतोपरी सहकार्य करू - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

नागपूर, दि. २६ : कर्करोग आजारावरील उपचार पद्धती ही दीर्घकाळ चालणारी आहे. आजारपणात आपलेपणाची कौटुंबिक किनार पाश्चिमात्य देशातील कुटुंबात पाहायला मिळत नाही. आपल्याकडे कुणी आजारी पडल्यास संपूर्ण कुटुंब आपलेपणाने रुग्णालयात त्याची साथ देतो. परिणामी कुटुंबियांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होतो. आजारपणातील भावनिक गुंतागुंत व संवेदना जपण्याचे केंद्र म्हणून स्वस्ती निवास ओळखले जाईल, असा विश्वास केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत जामठा परिसरातील स्वस्ती निवास या इमारतीचे भूमिपूजन तसेच कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार समीर मेघे, संस्थेचे अध्यक्ष ड. सुनील मनोहर, उपाध्यक्ष अजय संचेती, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर, वैद्यकीय संचालक डॉ. आनंद पाठक, पर्नो रिका इंडियाचे जॉन तुबुल आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, अनेक संस्थांची कार्यपद्धती मी जवळून पाहिली आहे. अनेक संस्थांमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे. तथापी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे ज्या संवेदनशीलतेने कॅन्सर रूग्णांसह त्यांच्या नातेवाईकांना धीर देत उपचार केले जातात ती भावनिक आपुलकी इतरत्र कमी आढळते. येत्या काळात देशातील सर्वात चांगल्या संस्थेमध्ये नॅशनल कॅन्सर इंस्टिट्यूटची गणना होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री श्री. शाह यांनी व्यक्त केला.

ज्या संस्थेमध्ये सेवाभाव असतो तसेच समाजात कुणीही दुःखी राहू नये ही भावना उराशी जपणारे सहकारी असतात त्या संस्था लोकांना अधिक भावतात. लाखो नागरिकांच्या दुःखात सहाय्यभूत होण्याचा विचार आजच्या काळात खूप महत्वाचा आहे. हा विचार खूप कमी लोकांमध्ये दिसून येतो या शब्दात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कॅन्सर इन्स्टिट्युटचा गौरव केला.

आज ही संस्था अल्पावधीतच वटवृक्ष झाली आहे. स्वस्ती निवासच्या माध्यमातून या इन्स्टिट्युटला पूर्णत्व देण्याचे काम आता होत असून यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मोलाचा वाटा असल्याचे गौरोद्गार केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांनी यावेळी काढले.

मोठ्या प्रमाणावर मुखकर्करोग आपल्या देशात आढळतो. सर्वाइकल कॅन्सर ही आढळतो. काही वर्षांपूर्वी कॅन्सर हा दुर्धर आजार समजला जायचा. मात्र, आता देशभरात अनेक चांगल्या कॅन्सर इन्स्टिट्यूट स्थापना झाल्या आहेत. त्यापैकी नागपुरातील कॅन्सर इन्स्टिट्यूट मध्यप्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड, महाराष्ट्र राज्यातील रुग्णांसाठी वरदान ठरली आहे. या इन्स्टिट्यूटला केंद्राकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल असे ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशातील आरोग्य क्षेत्रातील सेवा सुविधा अधिक भक्कम करण्यात येत आहेत. यात नवीन एम्सची निर्मिती, एमबीबीएस विद्यार्थी क्षमतेत वाढ, नवीन रुग्णालयांची निर्मिती व अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी भरीव तरतूद करण्यात येत असल्याचे केंद्रीय मंत्री श्री. शाह यांनी सांगितले.

**'एनसीआय'ला देशातील प्रीमियर रिसर्च इन्स्टिट्यूट म्हणून साकारू - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट ही संस्था देशातील प्रीमियर रिसर्च इन्स्टिट्यूट व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे. येत्या काळात हे ध्येय आम्ही नक्की साकारू. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट येथे सर्वोत्तम दर्जाच्या सुविधा रुग्ण आणि कुटुंबियांना उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कर्करोगावरील उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना निवासाची चांगली सुविधा निर्माण व्हावी यासाठी स्वस्ती निवासची निर्मिती करण्यात येत आहे. लवकरात लवकर ही व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. इन्स्टिट्युटमार्फत अनेक उपक्रम राबविले आहेत. जागतिक स्तरावर जे सर्वोत्तम तंत्रज्ञान उपलब्ध आहे ते येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे. या संस्थेचा आतापर्यंत यशाचा चढता आलेख राहिला असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इन्स्टिट्युटचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वस्ती निवासची माहिती देणारी ध्वनिचित्रफित दाखविण्यात आली.



**नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटची पाहणी**

केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी भूमिपूजन समारंभापूर्वी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत पाहणी केली. यावेळी त्यांनी इन्स्टिट्युटमधील सेवा व सुविधांबद्दल कौतुक केले. इन्स्टिट्युटचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर यांनी केंद्रीय मंत्री श्री. शाह यांना विविध सेवा व सुविधा विषयांची माहिती दिली.

**'स्वस्ती निवास' विषयी**

डॉ. आबाजी थत्ते सेवा आणि संशोधन संस्था व्यवस्थापनाने कॅन्सर रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियासाठी निवासी सुविधा तयार करण्याची योजना आखली आहे. ही सुविधा ' स्वस्ती निवास ' या नावाने ओळखली जाणार असून यातून कॅन्सर रुग्णांना उपचारादरम्यान राहण्याची सोय उपलब्ध होईल. स्वस्ती निवासाच्या माध्यमातून ४०० रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी निवासाची व्यवस्था उपलब्ध होईल. यातून रुग्णाच्या उपचारासाठी दीर्घकाळ राहण्याचा आर्थिक भार कमी होऊन कॅन्सर उपचार अधिक परवडणारे होण्यास मदत होणार आहे.

# हिमालयाची सावली ; त्यागमूर्ती माता रमाई

आज २७ मे, भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची पुण्यतिथी. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते.

वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रुढ होती. लग्नात पंच पक्कान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई.

रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत.

पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले.

मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आक्रांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले.

ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले.

हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!




# आधुनिक युगातील विकासपुरूष नितीनजी गडकरी...

आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते.कारण रस्त्यामुळेच दळणवळणाचा मार्ग मोकळा होतो व विकासाची दिशा ठरत असते.नितीनजी गडकरी यांच्या बुध्दीमत्तेचा व दुरदृष्टीतेचा वापर अनेक देश करीत आहे.त्यामुळे विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने व आदरतीथ्याने भारतासह संपूर्ण जगात घेतले जाते.आज जगात गडकरींचे नाव विकासपुरूष म्हणून मोठ्या आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते.औद्योगिक आणि तांत्रिकदृष्टया सर्वगुन संपन्न असलेले बलाढ्य देश अमेरिका, चीन, रशिया, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया यांना मागे टाकून महामार्गाच्या बाबतीत अव्वल स्थान मिळविने भारतासारख्या लोकशाही देशाकरीता अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी आपले लक्ष पुर्ण करण्यासाठी संपूर्ण शक्तीनिशी महामार्गाच्या कामाकडे लक्ष केंद्रित केले.त्यामुळेच आज भारत महामार्गाच्या जाळ्याच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे.कारण गडकरींना ग्यात होते की महामार्गाशिवाय देशाचा इतर बाबतीत सुद्धा विकास संभव नाही. त्यामुळे गडकरींनी जेव्हा राजकारणात पाऊल टाकले तेव्हा पाहूनच त्यांच्या मनात विकासाचे कालचक्र फिरत असावे.जनुकाय महाभारतातील संजयच म्हणावे लागेल. गडकरींनी विकासाची सुरूवात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असतांना पासून सुरू केली.यानंतर विकासाच्या बाबतीत मागे वळून कधीच पहाले नाही. २०१४ मध्ये नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री बनले तेव्हा पासून आजपर्यंत देशात हजारो किलोमीटरचे अत्याधुनिक पध्दतीने महामार्ग बनवून १४० कोटी जनतेला होणारा त्रास दुर झाला, त्याचबरोबर दळणवळण, आरोग्य सेवा,व्यापारी वाहतूकीला व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोठ्या प्रमाणात चालना मिळाली सोबतच गावागावात रोड बनवून गावतीथे सिमेंट रोड हि संकल्पना साकार होतांना दिसत आहे.त्याच पध्दतीने ७०१ किलोमीटरचा नागपूर- मुंबई समृद्धी महामार्ग बनवून विकासाचा नवीन इतिहास घडविला. यामुळे हजारो लोकांना रोजगार सुध्दा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.देशातील नवीन महामार्गामुळे हजारो किलोमीटरची वाहातुक सर्वांसाठी सुलभ झाल्याचे दिसून येते. यामुळे अनेक बाजारपेठांशी ताबडतोब संपर्क साधता येतो. गडकरींची कला अवगत करण्यासाठी विदेशातील अनेक एक्स्पर्ट व तज्ञ त्यांच्याशी सल्ला-मसलत करतात.त्यामुळेच आज जगात विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्राचा विकास सुवर्ण अक्षरांनी लिहावा या पध्दतीने गडकरींनी कार्य केल्याचे दिसून येते.आज नागपूरात आपल्याला मेट्रो धावतांना दिसत आहे. त्याचे संपूर्ण श्रेय माननीय गडकरींना जाते. मेट्रोमुळे लोकांपुढील वाहतुकीची कोंडी तुटली व मोठी सुविधा झाली. त्याचबरोबर अनेक बेरोजगारांना रोजगार देण्याचा मार्ग सुलभ केला.संपुर्ण महाराष्ट्रात उड्डानपुल व सिमेंट रोडमुळे महाराष्ट्राची संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.जी-२० च्या अनुषंगाने भारताचे केंद्रबिंदु असलेले नागपूर झगमगत होते यात गडकरींचा सिंहांचा वाटा आहे.यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रासह देशाला खरा विकासाचा मार्ग दाखविला असेल तर नितीनजी गडकरी यांनी त्यामुळेच त्यांना आज संपूर्ण देश सन्मानाने व आदराने सलाम करतो.राज्याच्या विकासासोबत देशाचा विकास सुरू असतांनाच राज्याची व देशाच्या संस्कृतीचे जतन करण्याची धुराही सांभाळण्याचे काम गडकरींनी केले.

नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात २०१८ पासून झाली.त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव साजरा केल्या जातो.यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात खास करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते.यामुळे महाराष्ट्राचा वारसा दिसून येतो.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे.पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने दरवर्षी आपल्याला खासदार महोत्सवात पहायला मिळतो आणि खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने खासदार क्रीडा महोत्सव दरवर्षी घेण्यात येतो.याचे संपूर्ण श्रेय गडकरींना जाते. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे. परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते.आज गडकरींच्या पुंण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुले व महामार्ग पहायला मिळते. त्यामुळेच त्यांना उडानपुलाचे प्रनेते सुध्दा म्हणतात आणि आता भारताला महामार्गाच्या जाळ्याच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आणुन गडकरींनी नवीन इतिहास घडविला आहे. नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे.नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे.आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा. विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सांस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.

आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येते.खासदार महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.१९४७ नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे. कमी कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचा विकास रोडच्या व उड्डाणपूलाच्या माध्यमातून करून देशाला विकासाची नवीन दिशा दिली आहे आणि जगात महामार्गाचा डंका वाजवला.याचाच गाजावाजा आज आपल्याला जगात पहायला मिळतो.त्यामुळे गडकरी भारताचेच नाही तर जगाचे विकास पुरूष आहेत असे मी समजतो.खरोखरच महाराष्ट्राचा व देशाचा विकासाचा मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा पुत्र नागपूर भुमित जन्माला आला ही देशासाठी गौरवाची बाब आहे.ज्या दिवसापासुन खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी व महाराष्ट्रासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची व क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पुर्णपणाला लावली आहे.भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात.परंतु असामाजिक तत्वांनी नागपूरमध्ये १८ मार्च २०२५ ची औरंगजेब यांच्या समाधीवरून उसळलेली दंगल वगळता कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी, ताजबाग, गणेश टेकडी,चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात.गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे.नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते.परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात.ही नागपूरसाठी व नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे.

गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत असते.आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी विकासपुरुषआहे.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम करीत आहे.खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.१९९७ मध्ये असाच सांस्कृतिक कार्यक्रम गडकरी यांनी स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यशवंत स्टेडियम येथे आयोजित केला होता. त्यातही आपल्याला कला, साहित्य व सांस्कृतिची जडन-घडन दिसून आली.असे विकास पुरूष केंद्रीय मंत्री सन्माननीय नितीनजी गडकरी यांची विकासाची गती उच्च शिखरावर जावो आणि महाराष्ट्रासह भारताचा विकास आणखी गतीशील होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

**- लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार) नागपूर.**

## जीवनाचं खरं यश म्हणजे ते पूर्णत्वाने जगणं..!

क्षणभंगुर जीवनाच्या प्रवासात माणूस धावत असतो - कधी पैशामागे,कधी नात्यांच्या ओढाताणीमध्ये,तर कधी प्रतिष्ठेच्या शोधात. पण या साऱ्या धावपळीत आयुष्य जगायचं राहूनच जातं.आजच्या स्पर्धेच्या युगात आपल्याला स्वतःसाठी थांबण्याची सवयच उरलेली नाही.आणि हाच आपल्या जीवनशैलीतील सगळ्यात मोठा विरोधाभास आहे. आपण दिवसेंदिवस नात्यांपासून दूर जात आहोत.

एकमेकांशी संवाद कमी झालाय, पण अहंकार वाढलाय. 'तो आधी बोलावा', 'त्यानेच माफी मागावी' या अशा अपेक्षा आपण मनात साठवत ठेवतो आणि नात्यांची मुळं हळूहळू सडत जातात.एखादी गोष्ट स्पष्ट बोलून प्रश्न सुटू शकतो,पण आपण अबोला धरतो.रुसवे-फुगवे इतके वाढतात की वर्षं उलटून जातात आणि शेवटी उरतं ते फक्त अपराधीपणाचं ओझं.

आयुष्य म्हणजे फक्त पगाराची चेकबुक,बँक बॅलन्स,किंवा चार लोकांनी 'यशस्वी' म्हणावं एवढंच नाही.हे सर्व असू शकतं,पण स्वतःचं समाधान नसेल,तर यशाचं मोलच शून्य ठरतं.आपण आपले छंद गमावतो,स्वतःची ओळख विसरतो,आणि जे खरं 'आपलं' आहे तेच हातातून निसटतं.

खरं म्हणजे प्रत्येक माणसाने 'आता' जगायला हवं. कोण किती काळ आहे..? कोणाची 'विकेट कधी पडेल?? हे आपल्याला माहीत नाही. मग का उगाच एकमेकांशी दुरावा? का स्वतःला नाकारत जगायचं.?

समाज,जात,धर्म,प्रतिष्ठा - या सगळ्या चौकटी ओलांडून माणूस म्हणून जगता आलं पाहिजे.आयुष्यात नाचायचं असेल तर नाचा,हसायचं असेल तर हसा,रडायचं वाटलं तर रडा - पण हे सगळं जगून घ्या.कारण शेवटी फोटोंमध्ये आपली हसलेली किंवा हरवलेली चेहरेच राहतात. आपण नेहमी पुढच्या पिढीसाठी काहीतरी कमवण्याच्या मागे लागतो. हे निश्चितच महत्त्वाचं आहे. पण त्यांनी तुमचं जगणं पाहिलं पाहिजे - फक्त तुमचं झुरणं नाही. मुलांना खऱ्या अर्थाने समृद्ध करण्यासाठी तुम्ही समाधानी, आनंदी, व मनस्वी जगलात, हे त्यांना जाणवलं पाहिजे. 'मन मारून जगणं' ही वृत्ती खूप मोठ्या मानसिक थकव्याला जन्म देते. म्हणूनच, स्वतःच्या इच्छा जपणं, आपल्या वेळेची किंमत ओळखणं आणि स्वतःवर प्रेम करणं - हे शिकायला हवं.

हे संपादकीय यासाठी आहे, फक्त आठवण म्हणून नाही, तर एक प्रश्न उपस्थित करण्यासाठी आहे - आपण खरोखर जगतोय का, की फक्त वेळ काढतोय?

म्हणूनच,जगायचं राहून जाऊ नये, असं जगा.स्वतःसाठी,आपल्या लोकांसाठी,आणि खरंखुरं आयुष्य अनुभवण्यासाठी.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये औद्योगिक व घरगुती ग्राहकांना वीजपुरवठ्यासाठी ट्रान्सफॉर्मर क्षमतेत मोठी वाढ

**छत्रपती संभाजीनगर** / शहर व परिसरातील विजेच्या वाढत्या वापरामुळे यंत्रणेवर येणारा ताण आणि त्यातून वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या सोडविण्यासाठी महावितरणतर्फे शिवाजीनगर, सातारा व रोशनगेट या निवासी क्षेत्रांसोबतच वाळूज औद्योगिक वसाहतीमध्ये अवघ्या पंधरा दिवसांत २५ एमव्हीएची पॉवर ट्रान्सफॉर्मर क्षमता वाढविण्यात आली. यामुळे २५ हजार घरगुती ग्राहकांसोबत १५०० औद्योगिक ग्राहकांना अधिक दर्जेदार वीजपुरवठा होईल. महावितरणचे तत्कालिन संचालक (संचालन) अरविंद भादिकर व प्रभारी सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांच्या नेतृत्वात मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, बीना सावंत, महेश पवार, कार्यकारी अभियंता प्रसाद महातोले, अविनाश चांदेकर, तत्कालिन कार्यकारी अभियंता महेश पाटील यांच्यासह अभियंते व कर्मचाऱ्यांनी ही कामगिरी केली.

वाळूज एमआयडीसीतील महावितरणच्या ३३ केव्ही ई सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीए क्षमतेचे दोन व ५ एमव्हीएचा एक पॉवर ट्रान्सफॉर्मर होता. त्याद्वारे सुमारे ७५२ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. एम सेक्टर उपकेंद्रात १० एमव्हीएचा एका व ५ एमव्हीएचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. त्याद्वारे सुमारे ६३१ उद्योगांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणाऱ्या विजेच्या मागणीमुळे सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यात आली. आता ई व एम उपकेंद्रांची एकत्रित क्षमता अनुक्रमे ३० व २५ एमव्हीए झाल्याने औद्योगिक ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

शिवाजीनगर परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली. शिवाजीनगर उपकेंद्रात १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर नुकताच कार्यान्वित करण्यात आल्यामुळे ७ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. शिवाजीनगर उपकेंद्रात याआधी ५ एमव्हीए क्षमतेचे प्रत्येकी दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून परिसरातील जवळपास १४ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे मोरेश्वर व देवगिरी फीडरवर सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता १५ एमव्हीए झाल्याने ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. सातारा व देवळाई परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली आहे.

यामुळे १२ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. सातारा उपकेंद्रात १० व ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून सातारा व देवळाई परिसरातील जवळपास २८ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. उपकेंद्रात ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्यात आला. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता २० एमव्हीए झाल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे. रोशनगेट परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली आहे. रोशनगेट उपकेंद्रातील १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर नुकताच कार्यान्वित करण्यात आला. यामुळे ६ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. रोशनगेट उपकेंद्रात १० व ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून परिसरातील जवळपास ११ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे जसवंतपुरा फीडरवर परिसरास सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता.

यावर उपाय म्हणून उपकेंद्रात ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्यात आला. आता उपकेंद्रातील दोन्ही पॉवर ट्रान्सफॉर्मरची एकत्रित क्षमता २० एमव्हीए झाल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

## संक्षिप्त

## सोमवारी (दि.२ जून) लोकशाही दिन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. एप्रिल महिन्यासाठी सोमवार दि.२ जून रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि.२ रोजी दुपारी १२ वाजता हा लोकशाही दिन होईल, असे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपले अर्ज, निवेदने सकाळी ११ ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार वैयक्तिक असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TAIT) आज(दि.२७)पासून

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये 'पवित'र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (TAIT) -२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने नियोजन दि.२७ मे ते ३० मे तसेच २ जून ते ५ जून या कालावधीत करण्यात आलेले आहे. त्यासाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्राची वेबलिंक महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

## लासुर स्टेशनचे भूमिपुत्र बाळासाहेब मोगल यांची उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल पत्रकार सेवा संघा वतीने सत्कार करण्यात आला..



**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी /फिरोज मन्सुरी**/ गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन चे भूमिपुत्र ( मोगल वस्ती) बाळासाहेब मोगल यांची पोलिस हेडकॉनस्टेबल पदावरून उपनिरीक्षक पदी पदोऊन्नती झाल्याने पत्रकार सेवा संघ व मराठी पत्रकार संघटनेच्यावतीने सत्कार करण्यात आला. दरम्यान यावेळी पत्रकार गुलाब वाघ, फिरोज मन्सुरी, आप्पासाहेब वंजारे सलीम सय्यद, साईराज चव्हाण, भूषण रणयेवले आदिची उपस्थिती होती.


## विकसीत कृषी संकल्प यात्रेचा गावनिहाय कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ वसंतराव नाईक कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, पैठण रोड, द्वारे दि.२९ मे ते १२ जून या कालावधीत 'विकसित कृषि संकल्प यात्रा' आयोजीत करण्यात येणार आहे. या यात्रेचा गावनिहाय प्रवास कार्यक्रम या प्रमाणे- - छत्रपती संभाजीनगर तालुक्यात दि.२९ मे कुंभेफळ, भांबरडा, दुधड, मुरुमखेडा, पिंपळखुंटा, लाडसावंगी, दि.३० मे- टोणगाव, हिवरा, जडगाव, जडगाव -२, पिंप्री राजा, आडगाव,दि.३१ मे- सय्यदपूर, औरंगपुरा, ढासला, ढवहापूरी, कासनापूर, फेरण जळगाव दि.१ जून- शेलूद, चारठा, हातमाळी, नायगव्हाण, लामकाना, लामकानावडी

पैठण तालुक्यात दि.२ जून- आडूळ, रजापूर, देवगाव, दाभरूळ, आंतरवाली, एकतूनी, दि.३ जून- बिडकीन, शेकटा, तोंडोळी, लोहगाव खु, लोहगाव खु, लोहगाव बु, मुलानी वडगाव, दि.४ जून- ढोरकीन, कारकीन, टाकळी पैठण, बोरगाव, भालगाव, इसारवाडी, दि.५ जून- पांगरा, निलजगाव, पोरगाव, लाखेगाव, पाडळी, डोणगाव, फुलंब्री तालुक्यात दि.६ जून - सांजूळ, बिल्डा, विटेकरवाडी, गणोरी, किनगाव, वारेगाव,दि.७ जून -पिंपळगाव देव, पिंपळगाव वळण, आडगाव, वाहेगाव, डोंगरगाव शिव, शिरोडी खु., दि.८ जून - पाल/पाथ्री, डोंगरगाव कवाड, पीर बावडा, गिरसावळी, मारसावळी, बाभूळगाव, दि.९ जून- बाबरा, वाहेगाव, निधोना, चिंचोली नकीब, कान्हेगाव, चिंचोली हिवरा, सिल्लोड तालुक्यात दि.१० जून - बनकिन्होळा, निल्लोड, गेवराई सेमी, भवन, केऱ्हाळा, पळशी, दि.११ जून- अन्वी, रहिमांबाद, आसाडी, सारोळा, पानवडद, पांगरी, सोयगाव तालुक्यात दि.१२ जून- जांगला, लोणापूर, सावरखेडा, वरखेडी, फर्दापूर, जामठी.

# अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या भागाची प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल द्या- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे यंत्रणेस निर्देश







**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ गेल्या आठवड्यात जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस, वीजा, वादळ इ. घटना घडल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे तसेच अन्य जीवित वा मालमत्तेच्या नुकसानीचे प्राथमिक पाहणी अहवाल प्राप्त असले तरी यंत्रणेने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन नुकसानीची पाहणी करावी,असे निर्देश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी यांच्याशी दुरदृष्य प्रणालीद्वारे संवाद साधला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित हे सुद्धा या बैठकीस दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. जिल्हा मुख्यालयातून अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर हे उपस्थित होते.

मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात ९८ गावे बाधीत झाली असून ५ व्यक्ती मयत तर ५ व्यक्ती जखमी झाले आहेत. ६६ जनावरे दगावली आहेत.

६२ पक्क्या घरांची तर ११२ कच्च्या घरांची अंशतः पडझड झाली आहे.जिल्ह्यात एकूण १२४६ शेतकऱ्यांचे ६१६.३ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे, अशी माहिती देण्यात आली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, गेल्या आठवड्यात अवकाळी पाऊस झाला आहे.विजा कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. या नुकसानीची क्षेत्रीय यंत्रणेने प्रत्यक्ष पाहणी करावी. पंचनामे इ. प्रक्रिया करावी व आपला अहवाल पाठवावा.

## कसाबखेडा फाटा पुला खालील खड्डे महामार्ग पोलिसांनी बुजवले संबंधित विभाग झोपेत..

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी**/ खुलताबाद तालुक्यातील कसाबखेडा फाटा, तसेच राष्ट्रीय महामार्गावरील पाचपीरव्डी येथील पुला खाली मोठे खड्डे पडले असून वाहनधारकांना तारेवरची कसरत करून आपली वाहने सावकाश चालवावी लागत होती. सदर ठिकाणी महामार्ग पोलीस केंद्र खुलताबाद येथील पोलीस हेड कॉन्स्टेबल सोपान झाल्टे व शांताराम सोनवणे यांनी जे.सी. बी. यंत्राच्या सहाय्याने खड्डे बुजवून वाहतूक सुरळीत केलेली आहे.



# रोजगार हमीच्या निधीसाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुभाष काळे यांचे आत्मक्लेश आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम**/ कन्नड पंचायत समिती अंतर्गत रोजगार हमी योजनेतील वैयक्तिक कामांचे पैसे मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असतांना प्रशासन डोळेझाक करीत असल्याच्या निषेधार्थ दि.२६ मे रोजी भाजप संभाजीनगर जिल्हाउपाध्यक्ष सुभाष काळे यांच्या नेतृत्वात आत्मक्लेश आंदोलन करण्यात आले. याबाबत श्री काळे यांनी सांगितले की,

मागील तीन वर्षाच्या कार्यकाळात पंचायत समिती कन्नड अंतर्गत मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक सिंचन विहीर, गुरांचे गोठे, वृक्ष लागवड, शेततळे, घरकुल, पांदण रस्ते आदी प्रकारचे कामे मंजूर करण्यात आली.

यात अनेक शेतकरी सदरील योजनेचा लाभ घेऊन आपले जीवनमान उंचावण्याच्या आशेपोटी या चक्रव्यूहात अडकले गेले. अनेकांनी दागिणे गहाण, सावकारी कर्ज घेऊण वैयक्तिक लाभांची कामे केलीत. यातील काही कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्या त्या आधारे त्यांनी योजनेचे निकषाप्रमाणे कामे करून घेतली. सरकारी पैसे आज न उद्या मिळतील या आशेवर जवळ पैसे नसताना त्यांनी बाहेरून सावकार, नातेवाईकां कडून हात उसने पैसे आणुन अशा प्रकारे कामे पूर्ण केली. प्रतीक्षेचा कालावधी दोन तीन महिन्या पर्यंत काही वाटले नाही. परंतु आता एक ते दोन वर्षे उलटून गेले? शासनाचा निधी न आल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

आम्ही सत्ताधारी पक्षाचे पदाधिकारी असल्याने ग्रामीण भागात फिरत असताना अनेकजण विचारतात की आमचे पैसे केव्हा येईल, आमचे पैसे येतील का ? आम्ही शासन स्तरावर माहिती घेतली, निश्चित वेळेचा अंदाज आला नाही. जी प्रशासकीय यंत्रणा ज्या प्रमाणात कामांच्या प्रशासकीय मान्यता वाटण्यासाठी जितकी तत्पर होती. त्या तत्परतेने पुढील कारवाई न झाल्यामुळे या शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. आणि त्याचा परिणाम अनेकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. या अनुषंगाने दि. २५ मे रोजी कन्नड पंचायत समिती येथे गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. परंतू त्याची पंचायत समिती प्रशासनाने कोणती ही दखल घेतली नाही असे आंदोलकांचे म्हणने आहे. त्यामुळे सोमवारी आत्मक्लेश आंदोलनात प्रशासनाला धारे वर धरण्यात आले.



या आंदोलनात भाजप जिल्हाउपाध्यक्ष सुभाष काळे यांच्या सहमा. उपसभापती सुनील निकम, कैलाश जाधव श्रीराम दादा जंजाळ, विलास भोजने, राजेंद्र भोजने, रूमदेव चव्हाण, विष्णू राठोड, गणेश चव्हाण, गणेश पवार, भक्तराज मुळे, संजय मुगले, रावसाहेब वर्पे, रामदास खवळे, कचरू सावंत, अमरसिंग राठोड, वाल्मीक निर्माळ, आप्पासाहेब नलावडे, सुदाम पवार, रामा राठोड, अर्चनाताई पवार, सुनिता निंभोरे, अकीला शेख, हौसाबाई चव्हाण, माधव भोजने, कृष्ण नलावडे, अरुण थोरात, विजय राठोड, शशिकांत नागरे, धीरज पाटील, बाबासाहेब काळे, संतोष बारगळ, यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंडळ अधिकारी कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी विशेष अभियान

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महसूल प्रशासनातील महत्वाचा दुवा असलेल्या मंडळ अधिकारी यांची कार्यालये जिल्ह्यात सोमवार दि.२ जून पासून कार्यान्वित करण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.मंडळ अधिकाऱ्यांना अधिक कार्यक्षम करण्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात ८९ महसूल मंडळे आहेत. त्यातील काही ठिकाणी मंडळ अधिकाऱ्यांची स्वतंत्र कार्यालये आहेत. काही ठिकाणी ते ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय येथून कामकाज करतात.

मंडळ अधिकारी हे तलाठी आणि तहसीलदार यांच्यातील महत्वाचा दुवा आहेत. मात्र, सध्या अनेक मंडळ अधिकारी कार्यालये अस्तित्वात नसल्याने महसूल कामकाजाला अडथळा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील मंडळ अधिकारी कार्यालये सुरू करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

शुक्रवार दि.३० मे पर्यंत आवश्यक जागा निश्चित करून सोमवार दि.२ जून रोजी मंडळ अधिकारी कार्यालये कार्यान्वित करावीत,असे निर्देश देण्यात आले आहेत. शासकीय इमारती उपलब्ध नसल्यास, शासनाच्या नियमांनुसार भाड्याने जागा घेण्याची मुभा देण्यात आली आहे. मंडळ अधिकाऱ्यांना महसूल अधिनियमातील अधिकार, जबाबदाऱ्या आणि कामकाजाबद्दल तातडीने प्रशिक्षण देण्याचेही आदेश आहेत.

या उपक्रमामुळे महसूल कामकाजाला वेग येणार असून, तलाठ्यांना वेळेवर मार्गदर्शन मिळणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना फेरफार व तत्सम कामांसाठी स्थानिक स्तरावरच सेवा मिळणार असल्यामुळे महसूल विभागाचा कामाचा दर्जा उंचावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## खुलताबादमध्ये साधेपणाने साजरा झाला मुघल बादशाहा औरंगजेब आलमगीर रह. यांचा ३१८ वा उरूस


**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी**/ अखंड हिंदुस्थानावर तब्बल ४९ वर्षे राज्य करणारे मुघल सम्राट अबु मुझफ्फर मोहम्मद मोहियोद्दीन उर्फ औरंगजेब आलमगीर रह. यांचा ३१८ वा वार्षिक उरूस सोमवारी, इस्लामी पंचांगानुसार २७ जिलकद १४४६ हिजरी म्हणजे २६ मे रोजी, खुलताबाद येथे अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात आला.

या निमित्ताने सकाळी फजरची नमाज अदा झाल्यानंतर औरंगजेब यांच्या मकबऱ्याचे जबाबदार खादिम व चोबदार यांनी त्यांच्या गुरूंच्या दर्ग्याचे म्हणजे हजरत ख्वाजा सय्यद जैनोद्दीन शिराजी उर्फ बावीस ख्वाजा रह. यांच्या दर्ग्यातून संदल, माळा व फुलांची चादर अर्पण केली.या नंतर सकाळी १० वाजता हाफिज-ए-कुरआन यांनी कुरआन शरीफचे पठण केले आणि त्यानंतर फातेहा ख्वानी पार पडली.दुपारी जोहरची नमाज अदा झाल्यानंतर भाविकांसाठी गोड भात वाटप करण्यात आले . रात्री ईशाची नमाज झाल्यानंतर अंतिम फातेहाने उरूसाचा समारोप करण्यात आला. या धार्मिक कार्यक्रमाला हजरत ख्वाजा सय्यद जैनोद्दीन शिराजी रह.दर्ग्याचे खादिम, स्थानिक भाविक तसेच औरंगजेब मकबऱ्याचे खादिम निसार अहमद आणि फेरोज अहमद उपस्थित होते.



## सिल्लोड तालूक्यातील अंधारी गावातील भाविकाचा केदारनाथ येथे मुत्यू:

**आत्ताच एक्सप्रेस**
**घाटनांद्रा प्रतिनिधि/ कदीर पटेल**/ सिल्लोड तालूक्यातील अंधारी येथील एका पन्नास वर्षीय भाविकाचा केदारनाथ येथे दर्शन रांगेत असताना ह्रदयविकाराच्या झटक्याने मुत्यू झाला. ही घटना शनिवारी केदारनाथ ( उतर प्रदेश) येथे घडली. मुत्यू व्यक्ति चे नाव काशिनाथ सांडु तायडे ( ५० ) वर्ष असे होते मुत्यू भाविकांचे नाव असुन ते शुक्रवारी पत्नीसह केदारनाथ यात्रेला गेले होते. मुत्यु भाविक काशिनाथ तायडे शनिवार ( दि. १७ ) केदारनाथ पोहचले होते दर्शन रांगेत असताना त्यांना ह्रदयविकाराचा तीव्र झटका झाला. यात त्यांचा मुत्यू झाला. त्यांच्यासोबत पत्नीसह गावातील तीन ते चार भाविक होते. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मुत्यू भाविकाला रूद्र प्रयाग येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले तेथे शवविच्छेदन करून मुतदेह रूग्णावाहिकेने दिल्ली येथे आणला. तसेच रविवारी तेथून विमानाने शिर्डी येथे आणला तेथुन रूग्णावाहिकेने सायंकाळी सहाच्या सुमारास सिल्लोड तालूक्यातील अंधारी या गावी आणला दरम्यान या घटनेने गावावर शोकाकुल पसरली आहे. त्याच्यावर शोकाकुल वातावरणात अत्यंसस्कारा करण्यात आले. मुत्यू व्यक्तिच्या पक्षात आई,वडिल,पत्नी, दोन मुले एक मूलगी असा परिवार आहे. त्यांच्या अत्यंसस्काराच्या वेळे अंधारीसह परिसरातले भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नवीन पाणीपुरवठा योजना गैरकारभाराची चौकशी करा - आमदार सतीश चव्हाण यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर शहरासाठी मंजूर करण्यात आलेली नवीन पाणी पुरवठा योजनेते मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होत असून या गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी शासनाने तातडीने चौकशी समिती नेमावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांकडे केली आहे.

नवीन पाणी पुरवठा योजनेच्या आर्थिक गैरकारभारासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि.२६) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती संभाजीनगर येथील नवीन पाणीपुरवठा योजना सन २०१९ मध्ये मंजूर करण्यात आली असून काम वेळेत पूर्ण करून शहराला आवश्यक तो पाणी पुरवठा केला जाईल अशी अपेक्षा होती. मात्र शहर वासियांना १० ते १२ दिवसाला पाणी मिळते. परिणामी शहरातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. योजनेचे काम अद्यापही अपूर्ण आहे. नवीन पाणी पुरवठा योजनेत जीव्हीपीआर कंपनीकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात येत असल्याच्या तक्रारी माझ्याकडे येत आहेत.

नियोजनात नसलेल्या आणि जीव्हीपीआर कंपनीशी संलग्न असलेल्या आणखीन एका दुसर्या कंपनीकडून कोट्यावधी रूपयांची यंत्रसामग्री, पंपिंग मशिनरी खरेदी करण्यात आली. बाजारात यापेक्षा दर्जेदार कंपन्यांची यंत्रसामग्री असताना निकृष्ट दर्जाची यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली असल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी निवदेनात म्हटले आहे.

शहरात ५३ पाण्याच्या टाक्या उभ्या करायच्या होत्या त्या सदरील कंपनीकडून आजपर्यंत झालेल्या नाहीत, शहरात १८०० किलोमीटर जलवाहिन्या टाकायचे ठरले त्यातील ५० टक्के सुध्दा काम पूर्ण झालेले नाही, जायकवाडी धरणात जॅकवेल उभारणीच्या कामात हलगर्जीपणा करण्यात येत असून तांत्रिक निकष आणि गुणवत्ता धाब्यावर बसविण्यात आली आहे, जलवाहिनी टाकताना चुकीच्या पध्दतीने एअर वॉल्व बसविण्यात आले असून नवीन पाणीपुरवठा योजनेतील संपूर्ण गैरकारभाराची चौकशी करण्यासाठी शासनाने तातडीने चौकशी समिती नेमावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी केली आहे.

## संक्षिप्त

### घाणेगावात नात्यातील महिलेला मारहाण करून विनयभंग

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** घनसावंगी तालुक्यातील घाणे-गाव येथे नात्याने भावजयी आसलेल्या चुलत दीराने मारहाण करून विनय भंग केल्याची घटना रविवार रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरुन घनसावंगी पोलिस ठाण्यात गणेश मदन साबळे, मदन विठ्ठल साबळे, गीता गणेश साबळे या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घनसावंगी तालुक्यातील घाणेगाव येथे पीडित महिला रविवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घरासमोरील आंगणात बसलेली होती. त्याचवेळी तिचा चुलत दीर गणेश मदन साबळे हा दारूच्या नशेत आला व तू मला खूप आवडते असे म्हणत वाईट उद्देशाने उजवा हाता धरुन ओढला व मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून महिलेचा विनंयभंग केला. पीडित महिलेने आरडाओरडा केला असता तो तेथुन पळून गेला.

महिलेच्या ओरडण्याचा आवाज ऐकून त्यांचा मुलगा ज्ञानेश हा तेथे आला. व या घटनेचा जाब विचारण्यासाठी मुलासह महिला गेली असता गणेश मदने साबळे, मदन विठ्ठल साबळे, गिता गणेश साबळे यांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी व दगडाने मारहाण केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे पीडित महिलेने तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरुन घनसावंगी पोलिस ठाण्यात गणेश मदन साबळे, मदन विठ्ठल साबळे, गीता गणेश साबळे या तिघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे . तपास पोहेकॉ सोनवणे हे करीत आहेत.

# भोकरदन तालुक्यातील ग्रामपंचियतींमध्ये माहितीचा अधिकार कायदा कलम ४(१) प्रभावीपणे राबवा! - बोरसे गुरुजी



**आत्ताच एक्सप्रेस**
**भोकरदन प्रतिनिधी**/जालना जिल्हा उपाध्यक्ष आम आदमी पार्टी.... माहितीचा अधिकार २००५ कलम ४ (१) प्रमाणे प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयाने १ ते १७ बावी स्वत: प्रदर्शित करणे कायद्याने बंधनकारक असल्याचे आज भोकरदन पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांची भेट घेऊन माहितीचा अधिकार प्रभावीपणे राबवण्याबाबत चर्चा करण्यात आली. नुकताच पदभार घेतल्यामुळे मला थोडा वेळ द्या असे गट विकास अधिकारी म्हणाले.यावेळी तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत कार्यालये बंद असतात.ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाहीत गैरहजर असतात.जनतेची कामे होत नाहीत. अनेक लोकांच्या तक्रारी आहेत. माहिती अधिकारामध्ये माहिती मागणाऱ्या कार्यकर्त्यांना माहिती दिल्या जात नाही.

त्रास दिला जातो. इत्यादी बाबी गट विकास अधिकाऱ्याच्या कानावर टाकण्यात आल्या आणि माहिती अधिकार कायद्यातील कलम ४ (१) प्रमाणे १ ते १७ बाबी प्रत्येक ग्रामपंचायतने प्रभावीपणे प्रदर्शित कराव्यात यासाठी यापुढे आग्रह धरणार असल्याचे बोरसे गुरुजींनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

यावेळी करजगांवचे नागरिक आनंद कानडे,बोरसे गुरुजी तसेच आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते हजर होते. ग्रामपंचायत कार्यालय बंद राहत असल्याने पत्रव्यवहार करायचा कुणाकडे आम्ही दंड भरू पण माहिती देणार नाही. सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले तरी माहिती देणार नाही.

अशा प्रकारची मानसिकता पदाधिकार्यांची आहे.करजगांव ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत नियमीत बंद राहत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (क) (ख) तसेच कलम ५ (१) व (२) ची प्रभावी अंमलबजावणी करून संबधित १ ते १७ बाबींची माहिती अद्ययावत ठेवुन,माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचे ग्रामसेवकांनी तंतोतंत पालन करणेस्तव योग्य कार्यवाही करणे बाबत... पत्र देण्यात आले. पत्रात पुढे म्हटले आहे की,ग्रामपंचायत कार्यालय करजगांव सतत बंद आहे. अनेक जिओ टॅग व्हिडिओ पाठवलेले आहेत. तसेच गांवातील अनेक नागरिकांनी वेळो-वेळी जिओ टॅग फोटो आणि व्हिडिओ गटविकास अधिकाऱ्याकडे आणि विस्तार अधिकाऱ्यांकडे पाठवलेले आहेत याबाबत चर्चा झाली आणि प्रत्यक्ष भेट घेऊन ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत उघडे ठेवण्याबाबत तसेच ग्रामसेवकांनी कार्यालयात हजर राहण्याबाबत चर्चेतून गटविकास अधिकाऱ्यांच्या या अगोदर ही निदर्शनास आणुण देण्यात आले होते.ग्राम पंचायत कार्यालयच बंद त्यामुळे पत्र व्यवहार करण्यात तसेच माहिती घेण्यामध्ये अडचणी येतात. त्यामुळे नियमाप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालय कार्यालयीन वेळेत उघडे ठेवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ (१) (क) (ख) तसेच कलम ५ (१) व (२) ची प्रभावी अंमलबजावणी करून संबधित १ ते १७ बाबींची माहिती अद्ययावत ठेवुन,माहिती अधिकार कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करणेस्तव योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आग्रह धरण्यात आला. निवेदनाची एक प्रत मा.मुख्यकार्यकारी अधिकारि जि.प.जालना.यांना पाठवण्यात आ-लेली आहे.

# डॉ. संभाजी खराट यांच्या पुस्तकाचे मंगळवारी प्रकाशन

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** दिवंगत डॉ. संभाजी खराट लिखीत वैधव्याची समस्या आणि मुक्तीची दिशा या पुस्तकाचा प्रकाशन सो-हळा मंगळवारी २७ मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता आयोजित करण्यात आला आहे. एमजीएम विद्यापीठातील आर्यभट्ट हॉलमध्ये हा सोहळा होत असून या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सत्यशोधक डॉ. संभाजी खराट मित्रमंडळ, ग्रंथाली प्रकाशन आणि सर्व परिवर्तनवादी संघटना यांच्या वतीने हा पुस्तक प्रकाश सोहळा आयोजित केला आहे. यावेळी ज्येष्ठ विचारवंत व एमजीएम विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुधीर गव्हाणे, ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. प्रल्हाद लुलेकर आणि एमजीएम विद्यापीठाच्या स्त्री व लिंगभाव अभ्यास आंतरविद्या अभ्यास शाखा विभागातील प्रा.डॉ. मंजुश्री लांडगे या पुस्तकावर भाष्य आणि मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक विचारवंत प्रा. सुदाम चिंचाणे यांची उपस्थिती राहणार आहे. प्रकाशन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वर्षा संभाजी




खराट, कॉ. एस.बी. टाकळखेडे, प्रा. प्रभाकर गायकवाड यांनी केले आहे.

# उसाच्या दरात यंदाही 'समृद्धी'च वरचढ ! : शेतकऱ्यांना २९७० रुपये एफआरपी देण्याची कारखान्याची घोषणा

## २०० रुपयांचा दुसरा हप्ता लवकरच खात्यात होणार जमा - चेअरमन सतीश घाटगे

**आत्ताच एक्सपप्रेस**
**घनसावंगी प्रतिनिधी/** शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देणारा साखर कारखाना म्हणून मराठवाड्यात ओळख निर्माण केलेल्या समृद्धी साखर कारखान्याने यंदाही उच्चांकी भावाची परंपरा कायम ठेवली आहे. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दर देण्याची घोषणा कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी सोमवारी (दि. २६) केली. या घोषणेमुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठी मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

अंबड -घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उसाला योग्य मोबदला देण्यात समृद्धी साखर कारखाना मराठवाड्यात आघाडीवर राहत आला आहे. गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये समृद्धी कारखान्याने गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपी पेक्षा ११० रुपये अधिक भाव देत २ हजार ८०० रुपये प्रतीटन प्रमाणे अंतिम बिल दिले. तर गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये देखील समृद्धी साखर कारखान्यात गाळप झालेल्या उसाला उच्चांकी दिला आहे.

आता गाळप गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन भाव देण्याची घो-षणा केली आहे. पहिला हप्ता २५०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दिल्यानंतर लगेच दुसरा हप्ता २०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे देण्यात येणारी असल्याची माहिती समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी दिली आहे. दुसऱ्या हप्त्याची रक्कम वाटप झाल्यांनतर तिसरा हप्ता देखील लवकर शेतकऱ्यांना देण्यात असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये थेट २९७० रुपये प्रति मे. टन दराने एफआरपीची घोषणा करत समृद्धी कारखान्याने पुन्हा एकदा 'उस दर युद्धात' बाजी मारली असून दोन हंगामांप्रमाणेच यंदाही इतर कारखान्यांपेक्षा अधिक दर देत 'उस दर स्पर्धेत' आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

*** प्रतिक्रिया***
**लवकरच २०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे दुसरा हप्ता जमा करणार -**
समृद्धी साखर कारखाना हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या विश्वासावर उभा असून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा कारखाना म्हणूनच तो चालविल्या जातो. याचा आम्हाला अभिमान आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्येही शेतकऱ्यांच्या उसा-ला २९७० रुपये प्रती मे. टन दर देऊन शेतकऱ्यांचा विश्वास जपला आहे.पहिला हप्ता २५०० रुपये प्रती मेट्रिक टन प्रमाणे अदा केला आहे. लवकरच २०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे दुसरा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.
**-सतीश घाटगे, चेअरमन समृद्धी साखर कारखाना**



### सामाजिक कार्यकर्ते बाबू अण्णा कोयते यांचे निधन

**आत्ताच एक्सपप्रेस**
**परतुर प्रतिनिधी** / येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसे-नेचे जुने संस्थापक शिवसैनिक व बाबू अण्णा कोयते यांची वयाच्या ७० व्या वर्षी दीर्घ आजाराने आज दिनांक २६ मे रोजी दुखद



निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली एक मुलगा भाऊ भावजया नातवंडे असा मोठा परिवार आहे . दरम्यान सायंकाळी आठ वाजता त्यांचावर येथील स्मशानभूमी परतुर येथे अंत्यसंस्कार करण्यात आला. होलांनी दाल मिल परिसर मोंढा विभागात त्यांच्या राहता घरापासून त्यांची अंत्यविधी निघाली असता. यावेळी मोठ्या संख्येने शिवसैनिकांची सामाजिक कार्यकर्ते व विविध राजकीय नेत्यांची त्यांच्या नातेवाईकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# .....गेले ते दिवस राहिल्या फक्त आठवणी

## शाहू विद्यालय जायकवाडी उत्तर येथे माजी विद्यार्थी शिक्षकांचा स्नेह मेळावा कार्यक्रम संपन्न

**आत्ताच एक्सपप्रेस**
**पैठण प्रतिनिधी** / पैठण तालुक्यातील शाहू विद्यालय जायकवाडी उत्तर येथे २५ वर्षां पूर्वी १९९९/२००० यावर्षी शिकत अस-लेले माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन (गेट-टुगेदर) नुकतेच मोठ्या उत्स-ाहात रविवारी दिनांक २५ / ५ /२५ रोजी पार पडला. वयाच्या ४० वर्ष ओलांडलेल्या माजी विद्यार्थी



विद्यार्थ्यांनी एकत्र येत राष्ट्रगीत म्हणून आपल्या शालेय जीवनातील जुन्या आठवर्णीना उजाळा दिला. यावेळी माजी विद्यार्थी विद्याथ्यांनी यांनी शाळेतील गमतीजमती सांगून एकत्र आलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी सहकार्य करण्याची भावना व्यक्त करून जुन्या आठवणी ताज्या करून उजळणी केली. शाळेतील सवंगडी, वर्ग आणि लोखंडी बेंच यांची आठवण आयुष्यभर मनात घर करून राहते, त्यामुळे अशा स्नेहसंमेलनांचे आयोजन नेहमी व्हावे, अशी अपेक्षा आलेल्या आनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त करून दाखवले. या कार्यक्रमास ३० विद्यार्थिनी व ७० माजी विद्यार्थी उपस्थित होते.

दुख अडवायला... उंबऱ्या सारखा.. मित्र वणव्या मधे गारव्या सारखा...

वाट चुकणार नाही जीवन भर तुझी... एक तू मित्र कर आरश्या सारखा...

आत्म हत्याच करणार नाही कुणी... मित्र असला जवळ मना सारखा... त्रासलो जिंदगी वाचताना पुन्हा... त्रासलो जिंदगी चाळताना पुन्हा... एक धडा मैतरी... वाचण्या सारखा... मैत्री चाटते गाय होऊन मना जा बिलग तू तिला वासरा सारखा..... मित्र वणव्या मधे गारव्या सारखी.. मुख्याध्यापक शंकर वाघमोडे , जगताप , सपकाळ , पोटोडे , जाधव , भारती सर , लांडे सर , संजय माळी सर , धांडे सर , एचपी देवकर , उगले , ईरमळ , सोनवणे , घोडके , थोटे मामा , शेजुळ मामा ,सर्व विद्यार्थी यांनी शिक्षक गुरुजन वर्ग स्नेहसंमेलन गेट-टुगेदर निमित्त उपस्थित असलेल्या सर्व शिक्षकांचे शाल व पुष्पहार देऊन आपल्या शिक्षकांचा सत्कार केला .

या कार्यक्रमाचे आयोजन श्री भरत मुकुटमल , योगेश थोटे, संतोष तासकर , पांडुरंग श्रीराम , अनिस सय्यद, कैलास बर्फे या विद्यार्थ्यांनी विशेष मेहनत घेऊन गेट-टुगेदर चा कार्यक्रम घेतला.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जीवन राजपूत यांनी अतुल गिरी केले.

# महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर राजकारण नव्हे, तर कर्तव्यदक्ष नेतृत्व हवं - डॉ. शंकर चव्हाण

**मुंबई/ प्रतिनिधी** / राज्यात महिलांवर अत्याचार, बलात्कार, छेडछाड आणि लैंगिक शोषणाच्या घटना वाढत चालल्या आ-हेत. गावपातळीपासून ते शहरी भागांपर्यंत, महिला सुरक्षिततेच्या बाबतीत सरकार अपयशी ठरत आहे. अशा गंभीर स्थितीत, महिलांना न्याय मिळावा, त्यांचे हक्क सुरक्षित राहावेत आणि त्यांच्या तक्रारींवर वेळीच आणि योग्य पद्धतीने कारवाई व्हावी यासाठी महिला आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्व-ाची ठरते. परंतु दुर्दैवाने या महत्त्वाच्या संस्थेचं अध्यक्षपद केवळ राजकीय वशिल्याच्या आधारे दिलं जातं, आणि त्यामुळे आयोग निष्प्रभ, बेजबाबदार व दिशाहीन होत चालला आहे. महिला आयोगाचं अध्यक्षपद ही केवळ एक राजकीय संधी नसून, ती एक अत्यंत जबाबदारीची, संवेदनशील आणि प्रभावी पदवी आहे. या पदावर असलेली व्यक्ती ही केवळ चेहरा किंवा शोभेची बाहुली नसावी. ती व्यक्ती ही कायद्याचं सखोल ज्ञान अस-लेली, महिलांवरील गुन्ह्यांविषयी जागरूक, सामाजिक जाण असलेली आणि निर्णयक्षमतेने काम करणारी असावी. म्हणूनच ड. शंकर चव्हाण यांची ठाम भूमिका आहे की, महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या, पण प्रशासकीय वा न्यायिक अनुभव असलेल्या पात्र आणि संवेदनशील व्यक्तीचीच निवड झाली पाहिजे. असे त्यांनी ट्विट केले आहे. त्यांचे स्पष्ट मत आहे की महिला आयोगाच्या अध्यक्षपदी एकतर निवृत्त महिला न्यायाधीश असाव्यात, किंवा निवृत्त महिला ख-ड अधिकारी असाव्यात. कारण अशा व्यक्तींना व्यवस्थेचं सखोल ज्ञान असतं, त्यांनी महिलांच्या प्रश्नांवर व्यवस्थेतील विविध स्तरांवर काम केलंलेलं असतं आणि त्यांच्यात निर्णय घेण्याची जबाबदारीची जाणही असते. राजकीय वशिल्याने भरती झालेल्या व्यक्तींना ना कायद्याची स्पष्ट समज असते, ना महिलांच्या प्रश्नांविषयी संवेदनशीलता.आज महिला आयोगाच्या सद्यस्थितीकडे पाहिलं, तर अनेक गंभीर प्रकरणांमध्ये आयोगाने काहीच ठोस भूमिका घेतलेली नाही. पीडित महिलांच्या कुटुंबीयांकडून तक्रारी आल्यानंतरही आयोग वेळेवर दखल घेत नाही, कारवाई करत नाही. त्यांचा हेतू काय आहे, याविषयी लोकांमध्येच शंका निर्माण होते. त्यामुळे महिला आयोगाची विश्वासार्हता कमी होत चालली आहे.जर खऱ्या अर्थाने महिला आयोग प्रभावी व्हायचा असेल, तर तिथे योग्य नेतृत्व हवे. केवळ पक्षाचा निष्ठावान कार्यकर्ता म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती महिलांच्या मूलभूत प्रश्नांवर कधीही न्याय देऊ शकत नाही. कारण ती व्यक्ती राजकीय दबावाखाली काम करते, आणि प्रत्येक कृतीसाठी पक्षाच्या हिताचा विचार करते. त्यामुळे, महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आयोगाला स्वतंत्र, सशक्त आणि सक्षम नेतृत्व हवे.आज परिस्थिति इतकी बिकट झाली आहे की महिलांवर अत्याचार होतात आणि त्यांना न्याय देणाऱ्या यंत्रणाच बघ्याच्या भूमिकेत असतात. मग हे आयोग काय फक्त रिपोर्ट पाठवण्यासाठीच असतात का? यंत्रणा जर निष्क्रिय असेल, तर



तिच्या प्रमुखाचा जबावदार कोण? म्हणूनच वेळ आली आहे की महिला आयोगाचं अध्यक्षपद ही राजकीय उपकृपा म्हणून न देता, वास्तवात कार्य करणाऱ्या, संवेदनशील आणि कायद्यानिष्ठ नेतृत्वाच्या हाती दिलं पाहिजे.महिलांच्या न्यायासाठी, त्यांचं सशक्तीकरण करण्यासाठी आणि समाजात त्यांचं स्थान सुरक्षित करण्यासाठी आयोग सारख्या संस्थेचं अस्तित्व गरजेचं आहे. पण त्याला खरी ताकद नेतृत्वातून मिळते. म्हणूनच आता समाजाने आणि सरकारने या मुद्द्यावर गांभीर्याने विचार करावा. आयोग हे फक्त एक पद किंवा फोटोसाठीचा कार्यक्रम नसून, तो महिलांच्या लढ्याचा आवाज आहे, आणि तो आवाज फक्त अभ्यासू, सक्षम आणि निडर नेतृत्वच बुलंद करू शकतं.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813